# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉइंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जावक क्र.मजीप्रा/सस/तांशा–1/350/ 1989 दिनांक : 1/7/1999

– // परिपत्रक // क्र.२१ –

विषय :– गनायटींगच्या कामामध्ये क्यूरींग बाबत खबरदारी घेणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून हाती घेण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या कामामध्ये ब–याच ठिकाणी पोलादी पाईप लाईन टाकण्याच्या कामांचा समावेश आहे. पोलादी पाईप लाईन गनायटींगसह टाकताना 'क्यूरींग' बाबत विशेषत्वाने लक्ष देणे आवश्यक आहे अन्यथा गनायटींगचा उद्देशच साध्य होऊ शकणार नाही. याबाबत पूर्वीही वेळावेळी सूचना देण्यात आल्या आहेत, मात्र या सूचनाबाबत क्षेत्रीय अधिका–यांकडून योग्य ती खबरदारी घेण्यात येत नसल्याचे गुण नियंत्रण कक्षाने माझ्या निदर्शनास आणून दिले आहे. क्षेत्रीय अभियंत्यास गनायटींगच्या कामामधील क्यूरींगचे महत्व न समजल्याने ही बाब अनाकलनीय आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने आपणास खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

1) गनायटिंगच्या कामामध्ये पुरेसे क्यूरींग न झाल्यास गनायटिंगला तडे जाऊ शकतात व गनायटींगची गुणवत्ता कमी होते. त्यामुळे पाईप्सच्या गनायटींगच्या कामास पुरेसे क्यूरीग व्हावे याबाबत दक्षता घ्यावी. यासाठी गनायटींग झाल्यानंतर क्यूरींग करण्यापूर्वी पाईप्स भोवती ओली पोती गुंडाळण्यात यावीत व ती कमीत कमी सतत 24 तास तरी ओली राहतील याची दक्षता घ्यावी अशा प्रकारे क्यूरींगची प्रक्रिया किमान सात दिवस तरी करावी.

2) पाईप्सला गनायटींग करण्यात आल्यानंतर किमान सहातास तरी त्या कामाचा थेट सूर्यकिरणाशी संपर्क होवू देवू नये-हयासाठी शेडची व्यवस्था आवश्यक आहे.

3) गनायटींगचे काम सूरु असताना काम योग्य रीतीने सूरु आहे किंवा कसे तसेच क्यूरींगबाबत दक्षता घेण्यात येत आहे किंवा नाही याबाबत कार्यकारी अभियंता यांनी अचानक कामास भेट देवून पडताळणी करावी व आवश्यक तेथे योग्य त्या सूचना क्षेत्रीय अधिका–यास दयाव्यात.

गनायटींगच्या कामाची गुणवत्ता पुरेशा क्यूरींग अभावी खालावू शकते याचा गांभार्याने विचार करुन याबाबत उपरोक्त सूचनांनुसार कार्यवाही करावी.

सही/-
(राजेंद्र सागणे)
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत
सचिव, पा.पु. व स्व.विभाग मंत्रालय मुंबई
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता म.जी.प्रा. नवी मुंबई